
# व्यंकटेश मध्ये रिसर्च अँड इनोव्हेशन वर चर्चासत्र संपन्न

" एन.इ.पी. 2020 नुसार एम.कॉम. अभ्यासक्रमांतर्गत ऑन जॉब ट्रेनिंग व फील्ड प्रोजेक्ट रिपोर्ट ठेवण्यामागे शासनाने विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेत असताना थिअरी बरोबर प्रत्यक्ष अनुभव घेतला पाहिजे व यामधून त्याच्या स्किलमध्ये वाढ झाली पाहिजे. हाच मुख्य हेतू डोळ्यासमोर ठेवला असून एन.इ.पी. 2020 नुसार एम. कॉम. अभ्यासक्रमांतर्गत ऑन जॉब ट्रेनिंग व फील्ड प्रोजेक्ट रिपोर्ट याचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी - विद्यार्थिनींनी याचे सखोल ज्ञान घेणे गरजेचे आहे. " असे प्रतिपादन डी. आर. माने महाविद्यालय, कागल यांचे प्राचार्य डॉ. एन. एल. कदम यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय , इचलकरंजी येथे घेण्यात आलेल्या 'रिसर्च इनोव्हेशन, ऑन जॉब ट्रेनिंग अँड फिल्ड प्रोजेक्ट रिपोर्ट अंडर एनईपी' या विषयावरील चर्चासत्रात बोलत होते. महाविद्यालयामध्ये अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि संशोधन विकास यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. सदर चर्चासत्राच्या पहिल्या सत्रामध्ये डॉ. एन. एल. कदम यांनी 'प्रेपरेशन ऑफ प्रोजेक्ट रिपोर्ट' आणि 'इम्प्लिमेंटेशन ऑफ जॉब ट्रेनिंग' याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. तर दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. एस. एन. जरंडीकर यांनी 'रीसर्च इनोवेशन अँड स्टार्टअप इकोसिस्टीम' या विषयाचे मार्गदर्शन केले. सदर चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने उपस्थित होते. चर्चासत्राच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे यांनी प्रास्ताविक केले तर प्रमुख पाहुण्याची ओळख डॉ. एस. एच. आंबवडे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका एम. एस. आंचलिया आणि आभार प्रदर्शन डॉ. टी. एच. नायकवडी यांनी मांडले. सदर चर्चासत्रात इचलकरंजी परिसरातील विविध महाविद्यालयांमधून एम. कॉमचे विद्यार्थी-विद्यार्थिनी व प्राध्यापक उपस्थित होते.


INTERNAL QUALITY ASSURANCE CELL &
RESEARCH DEVELOPMENT CELL
PARIS SPARSH SCHEME
ONE DAY WORKSHOP
under NEP
Shri Venkatesh Mahavidyalaya,